जुन्या / मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत
पावसाळ्यापुर्वी करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: विसआ - २०१५/प्र.क्र. ३४९/नवि-२०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०१५.

प्रस्तावना :-

राज्यात दरवर्षी पावसाळ्यात जुन्या / मोडकळीस आलेल्या इमारती कोसळून जिवीत व वित्त हानी होते. याबाबत विधानमंडळात वारंवार चर्चा होते. अशा घटना टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर जुन्या / मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

जुन्या / मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत:-

१) दरवर्षी मार्च / एप्रिलच्या दरम्यान जुन्या / मोडकळीस आलेल्या इमारतीची पहाणी करुन त्याचे
सी-१ (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या),
सी-२ए (इमारत रिकामी करुन संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या),
सी-२बी (इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या),
सी-३ (इमारतीची किरकोळ दुरुस्ती प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या). या प्रकारात वर्गीकरण करावे.

२) सी-१ प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या इमारतींना महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३५४ (१) अन्वये नोटीस बजावून इमारत निष्कासित करावी.

३) इमारती रिकाम्या करण्यापूर्वी त्यामधील भाडेकरु / सदनिकाधारक यांच्या ताब्यात असलेले चटई क्षेत्रफळ मोजून त्याप्रमाणे प्रत्येक भाडेकरु / सदनिकाधारक व मालक / सहकारी संस्था यांना तसे प्रमाणपत्र देण्यात यावे.

४) इमारती निष्कासित / रिकाम्या करण्यास अडथळा निर्माण झाल्यास त्या इमारतीची विद्युत जोडणी व जल जोडणी खंडीत करण्यात यावी.

५) महापालिकेच्या मालकीच्या इमारतीमधील रहिवाशांची सदर इमारत निष्कासित करण्यापुर्वी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

६) मा.उच्च न्यायालय, मुबई याचिका क्र. ११३५/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे धोकादायक / मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतीतील रहिवाश्यांना स्थलांकरित करावयाची जबाबदारी पोलीस विभागाची आहे, त्यानुसार कार्यवाही करावी.

७) न्यायप्रविष्ट प्रकरणात न्यायालयाचा मनाई / स्थगिती आदेश असल्यास इमारत कोसळून काही वित्तीय व जिवित हानी झाल्यास महापालिका/ नगरपालिका जबाबदार रहाणार नाही याबाबत संबंधित न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करुन मनाई / स्थगिती आदेश उठविण्याबाबत विनंती करण्यात यावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१५११०५१२१९१७०७२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Jayasingrao N Patil

Digitally signed by Jayasingrao N Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jayasingrao N Patil
Date: 2015.11.05 12:20:38 +05'30'

(ज.ना. पाटील)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
८) सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) आयुक्त, सर्व महानगरपालिका
१०) नगर विकास विभागातील सर्व कार्यासने
११) निवडनस्ती, (नवि-२०), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.